# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/विधि व न्याय/कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१७/४४६१ दिनांक : ८/०८/२०१७

प्रति,

मा. महासंचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र राज्य, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र राज्यातील मा.उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर तसेच सहकार न्यायालये व सहकारी अपील न्यायालयापुढे प्राधिकरणातर्फे सहकारी संस्थांचे निवडणूक विषयक कामकाज करणा-या अधिका-यांची बाजू न्यायालयापुढे मांडणेसाठी प्रत्येकी एका वकीलास तालीकेवर घेणेबाबत जाहीर निवेदन शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांना मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर तसेच महाराष्ट्र राज्यातील सहकार न्यायालये व सहकार अपिल न्यायालयातील निवडणूकां विषयक वादामध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर साठी १ अतिरीक्त अधिवक्ता व चालू सहकार न्यायालये मुंबईसाठी ४ अधिवक्ता तसेच पुणे, सांगली, कोल्हापूर साठी प्रत्येकी २ असे एकूण ६ व ठाणे, अलिबाग(रायगड), नाशिक, जळगाव, अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, सातारा, सोलापूर, नांदेड, नागपूर, लातूर साठी प्रत्येकी १ असे अधिवक्ते त्याचप्रमाणे सहकार अपिलेट न्यायालय मुंबई-२, नागपूर व पुणे साठी प्रत्येकी १ प्राधिकरणाची बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी पात्र व इच्छूक अधिवक्त्यांची प्राधिकरणाचे तालिकेवर नियुक्तीसाठी जाहीर निवेदनाव्दारे आवेदनपत्र मागविणेबाबतची जाहीरात महाराष्ट्र राज्यातील सर्व विभाग स्तरावर **दि.१८/०८/२०१७** रोजी फक्त एक वेळच्या मधल्या पान क्र. ३ व ४ मध्ये प्रसिध्द करावी.

उपरोक्त निवेदन कमीत कमी जागेत व शासकीय दराने प्रसिध्द करून देयके विहीत नमून्यात व आकारात प्राधिकृत पत्रासह उपलब्ध करून देण्यात यावी.

**मा.आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशाने**

०८/०८/१७
(यशवंत गिरी)
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत** —

१) मा.अपर मुख्य सचिव(सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२
२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
४) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,

अ.क्र. ३ व ४ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त जाहीर निवेदन त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे वकील संघाचे तसेच सहकार न्यायालयाचे व सहकार अपील न्यायालयाचे वकील संघाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावे.

**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१**
**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी** :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/विधि व न्याय/कक्ष-१४/अधिवक्ता तालिका /२०१७/४४६१ दिनांक : ८/०८/२०१७

# -: जाहीर निवेदन :-

मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर, मा. सहकार न्यायालय व मा. सहकार अपिलेट न्यायालयातील सहकारी संस्थांच्या निवडणूकी विषयक वादांमध्ये प्राधिकरण व प्राधिकरणाधिकृत निवडणूक अधिकारी यांच्यातर्फे मा. उच्च न्यायालय मुंबई व खंडपीठ नागपूर साठी १ अतिरीक्त अधिवक्ता व चालू सहकार न्यायालये मुंबईसाठी ४ अधिवक्ता तसेच पुणे, सांगली, कोल्हापूर साठी प्रत्येकी २ असे एकूण ६ व ठाणे, अलिबाग(रायगड), नाशिक, जळगाव, अहमदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, सातारा, सोलापूर, नांदेड, नागपूर, लातूर साठी प्रत्येकी १ असे अधिवक्ते त्याचप्रमाणे सहकार अपिलेट न्यायालय मुंबई-२, नागपूर व पुणे साठी प्रत्येकी १ प्राधिकरणाची बाजू मांडणेसाठी व प्रकरणे हाताळण्यासाठी, पात्र व इच्छूक अधिवक्त्यांची प्राधिकरणाच्या नामतालीकेवर (Empanelment) निवड करण्यासाठी, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-४०० ००१ यांचेकडून विहीत नमुन्यात आवेदन पत्र मागविण्यात येत आहेत.

अर्जाचा नमुना, नेमणूकीसाठी पात्रता, अर्जासोबत सादर कराव्या लागणा-या स्वयं साक्षांकीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती व कागदपत्रे. इत्यादीची माहिती सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ https://sahakarayukta.maharashtra.gov.in वरून download करून मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे-४०० ००१ यांचेकडे जाहीरात प्रसिध्द झालेपासून **दि. १८.०९.२०१७** पर्यंत सादर करावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आवेदन पत्राचा विचार केला जाणार नाही. मागील दि.२४.०६.२०१७ ते २४.०७.२०१७ या कालावधीत ज्यांनी सदर जाहिरातीच्या अनुषंगाने परिपूर्ण आवेदनपत्रे सादर केलेली आहेत त्यांनी पुनश्च: आवेदनपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.

०८/०८/१७
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

ठिकाण — पुणे
दिनांक - ०८/०८/१७